साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

वर्ष 31 वे

| परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

**संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे**
**संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे**
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर, मो.९४२३३३७४८०

| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com

नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक १३७ | पाने-१२ | दि.११/८/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रू.




# शेकडो किलोमीटरसाठी खर्च, मात्र आठ किलोमीटरसाठी दुर्लक्ष

## वडशिवणे तलाव वंचित

करमाळा : उजनी जलाशयाचे पाणी पाटबंधारे विभाग मार्फत मराठवाड्यात शेकडो किलोमीटरचा बोगदा खोदून घेऊन जाण्याचे काम सुरू आहे. उजनीच्या जवळ अवघ्या आठ किलोमीटर अंतरावर वडशिवणे तलाव असताना त्यात मात्र पाटबंधारे विभाग पाणी सोडत नाही. यामुळे वडशिवणे, केम परिसरातील शेतकरी निराश आहेत.

मराठवाड्यातील दुष्काळ हटविण्या-कामी राज्यशासनाच्या पाटबंधारे विभाग मार्फत उजनी ते सीना नदी पार करून भुम, परांडा भागात पाणी घेऊन जाण्याचे नियोजन सुरू आहे. त्यानुसार करोडो रूपये खर्च करून बोगदा खोदून त्यातून पाणी नेण्याचे नियोजन सुरू आहे. उन्हाळा, पावसाळा हे काम चालूच असून वडशिवणे तलावात मात्र पाणी सोडण्यासाठी शासन दुर्लक्ष करीत आहे. यामुळे वडशिवणे, केम, सातोली, मलवडी, पाथुर्डी या गावातील शेती बागायत होऊ शकते.परंतु सोपे काम असूनही शासन त्याकडे दुर्लक्ष करत आहे.

> वडशिवणे तलाव १९०२ साली पूर्ण झाला. त्यात १५३.६१ द.श.घ.फुट पाणीसाठा होऊ शकतो. २.८२ द.श.ल.घ.फुट मृतसाठा आहे. तर १५०.७९ द.श.ल.घ.फूट उपयुक्त पाणीसाठा आहे. धरणाची लांबी ३६२७ फुट आहे. धरणाचा सांडवा ३९९ फुट लांबीचा आहे. लागवडीलायक क्षेत्र ११०० हेक्टर असून डावा कालवा १० किलोमीटर तर उजवा कालवा तीन किलोमीटर लांबीचा आहे. वडशिवणे तलावात पावसाळ्यात पाणी सोडले की उन्हाळा हंगामापर्यंत या भागातील शेतकरी शेती बागायत करू शकतात.

सदर कामी शासनाने तातडीने निर्णय घेऊन वडशिवणे तलावात पाईपद्वारे पाणी सोडावे. त्यामुळे शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल; असे मत केमचे माजी सरपंच अजित तळेकर, सामाजिक कार्यकर्ते गणेश पवार तसेच वडशिवणेचे माजी सरपंच रत्नाकर कदम यांनी व्यक्त केले आहे.

**५१ व्या वर्धापन दिनाला प्रशासक !**
**संपादकीय पान नं.२ वर**



जीवनात प्रगती आपोआप होत नसतो, त्यासाठी नवे विचार स्विकारून त्याची अमंलबजावणी करावी लागते.

## संपादकीय...................................!

# ५२ व्या वर्धापन दिनाला प्रशासक !

राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांचा कालावधी २१ मार्च २०२२ रोजी संपला. त्या आगोदरच निवडणुका होणे आवश्यक होते पण आरक्षणाचा मुद्दा. त्यानंतर वाढलेले गट व गण या घोळात निवडणुका लांबल्या आणि मिनी मंत्रालयाचा कारभार प्रशासनाच्या ताब्यात गेला. अद्यापही निवडणुका जाहिर नाहीत, त्यामुळे जिल्हा परिषद स्थापनेचा वर्धापन दिन १५ ऑगस्टला असताना कारभार मात्र प्रशासनाकडे असे वेगळेच चित्र दिसत आहे.

जिल्हा परिषद म्हणजे जिल्हा पातळीवर ग्रामीण जनतेला नागरी सुख सोयी पुरवणारी आणि विकास कार्यक्रमात भाग येणारी एक अधिकृत व महत्वपुर्ण संस्था आहे. जिल्हा परिषदेचा इतिहास मोठा रंजक आहे. ब्रिटीश कालावधीत मुंबई इलाख्यात सन १८८४ साली ब्रिटीशांनी लोकल बोर्ड ॲक्ट स्थापन केले. या ॲक्ट नुसार लोकल बोर्ड अस्तित्वात आले. त्यानुसार काही लोक ठरावीक मतदाराच्या मतदानातून निवडणुकीने तर बहुसंख्य लोक सरकार नियुक्त असत व त्यांचेच बहुमत असे तर जिल्हाधिकारी हाच त्या बोर्डाचा अध्यक्ष म्हणून काम पाहत असे. सन १९२३ ला या ॲक्टमध्ये बदल केला गेला. त्यात लोकनियुक्त प्रतिनिधींचे प्रमाण वाढले व जिल्हाधिकारी ऐवजी लोकनियुक्त प्रतिनिधी हाच अध्यक्ष म्हणून काम पाहू लागला. पुढे सन १९३८ ला त्यात आणखी बदल केला व सरकारने सदस्य नेमावयाची पध्दत बंद केली. पुढे सन १९४७ ला देश स्वतंत्र झाला. त्यानंतर लोकल बोर्डाच्या निवडणुकीसाठी सर्व प्रौढांना मतदानाचा अधिकार मिळाला. १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्राची स्थापना झाली. त्यानंतर २० जून १९६० ला लोकशाही विकेंद्रीकरण समितीची स्थापना झाली. त्या समितीचे अध्यक्ष माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक हे होते. या समितीच्या बहुतांशी सुचना राज्य शासनाने मान्य केल्या. त्यानुसार १९६१ ला जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम संमत करण्यात आला व जिल्हा परिषद-पंचायत समितीच्या स्थापना झाल्या. त्यानंतर सन १९६२ ला जिल्हा परिषद-पंचायत समितीच्या निवडणुकाही झाल्या आणि १५ ऑगस्ट १९६२ पासून जिल्हा परिषदेचे कामकाज सुरू झाले. त्यामुळे जिल्हा परिषदेचा १५ ऑगस्ट हा वर्धापनदिन आहे. राज्यात ३६ जिल्हे आहेत पण जिल्हा परिषदा फक्त ३४ आहेत. मुंबई शहर व मुंबई उपनगर हा शहरी भाग असल्याने ते दोन जिल्हे वगळून अन्यत्र जिल्हा परिषदेची स्थापना केली. तिथे जिल्हा परिषद ऐवजी महानगरपालिका आहेत. यानुसार सोलापूर जिल्हा परिषदेची स्थपानाही १९६२ ला झाली असून सोलापूर जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष होण्याचा बहुमान करमाळ्याचे सुपुत्र, स्वातंत्र्यसैनिक व माजी आमदार नामदेवराव जगताप यांना मिळाला हे विशेष आहे. त्याचे कारण म्हणजे जिल्हा परिषद स्थापनेदरम्यान विधानसभा निवडणुका झाल्या व त्यावेळी कै. जगताप यांना त्यांचे सख्खे बंधु कै.पांडूरंग तथा अण्णासाहेब जगताप यांनी पराभूत केले होते. त्यामुळे काँग्रेसने नामदेवराव जगताप यांना जिल्हा परिषदेचे अध्यक्ष करून पुन्हा सत्तेत ठेवले होते.

सोलापूर जिल्हा परिषदेत ११ तालुका पंचायत समिती कार्यरत आहेत. त्यामध्ये करमाळा,उत्तर सोलापूर,दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मंगळवेढा, पंढरपूर, सांगोला, माळशिरस, मोहोळ व माढा यांचा समावेश आहे. जिल्ह्यातील ११ तालुक्यात सर्वात मोठा तालुका म्हणून करमाळा तालुक्याची ओळख आहे. करमाळा तालुका हा १६०९.७ स्वे. किलोमीटर इतका आहे तर सर्वात कमी क्षेत्राचा तालुका म्हणून दक्षिण सोलापूर तालुक्याची ओळख आहे. त्याचे क्षेत्रफळ ७३६.३ स्वे.किलोमीटर इतके आहे. जिल्हा परिषदेत सर्वात महत्वाची स्थायी समिती असते. त्याशिवाय बांधकाम, कृषी, समाजकल्याण, शिक्षण, आरोग्य, पशुसंवर्धन, दुग्धविकास, महिला आणि बालकल्याण, जलसंधारण आणि पाणी पुरवठा अशा विषय समित्या असतात.

सोलापूर जिल्हा परिषदेत प्रशासक येण्यापुर्वी ६८ जिल्हा परिषद गट होते, ते शासनाने वाढवून ७७ केले आहेत. त्यानुसार करमाळा तालुक्यात सहा जिल्हा परिषद गट आहेत. त्यामध्ये पांडे, वीट, कोर्टी, चिखलठाण, वांगी व केम, माढा तालुक्यात आठ जिल्हा परिषद गट आहेत. त्यामध्ये मोडनिंब, टेंभुर्णी,रांझनी, कुर्डु, लऊळ, उपळाई (बु.) म्हैसगाव, व भोसरे यांचा समावेश आहे. बार्शी तालुक्यात सहा मतदार संघ आहेत, त्यामध्ये शेळगाव आर, मालवंडी, पानगाव, उपळे दुमाला, पांगरी, उपळाई (ठों) यांचा समावेश आहे. पंढरपूर तालुक्यात १० जिल्हा परिषदेचे गट आहेत, त्यामध्ये करकंब, भोसे, रोपळे, पुळूज,गोपाळपूर,गुरसाळे, भाळवणी, वाखरी, टाकळी व कासेगाव यांचा समावेश आहे. माळशिरस तालुक्यात सर्वात जास्त ११ जि.प.चे गट आहेत. त्यामध्ये दहीगाव, फोंडसिरस, संग्रामनगर, यशवंतनगर, माळीनगर, बोरगाव, मांडवे, कन्हेर, तांदुळवाडी व पिलीव. सांगोला तालुक्यात आठ जि.प.चे गट आहेत. त्यामध्ये महूद (ब्रू.), एखतपूर, वाढेगाव, कडलास, अकोला, चोपडी, कोळा, घेरडी. मंगळवेढा तालुक्यात पाच मतदार संघ आहेत. त्यामध्ये संत दामाजी नगर, हुलजंती, संत चोखोबानगर, नंदेश्वर, भोसे. यांचा समावेश दक्षिण सोलापूर मध्ये सात मतदार संघ आहेत. त्यामध्ये बोरामणी, वळसंग, कुंभारी, होटगी, हत्तूर,मंद्रुप व भंडरकवठे.उत्तर सोलापूर तालुक्यात फक्त दोन मतदार संघ आहेत. त्यामध्ये दारफळ बी बी व कोंडी यांचा समावेश आहे.मोहोळ तालुक्यात सहा मतदार संघ आहेत. त्यामध्ये आष्टी, नरखेड, कामती (ब्रू) पोखरापूर, पेनूर, करूल तर अक्कलकोट तालुक्यात सात जिल्हा परिषद गट आहेत. त्यामध्ये चपळगाव,वागदरी, जेऊर, मंगरूळ, नागणसूर, सलगर व तोलनूर यांचा समावेश आहे.

अशा या जिल्हा परिषदेत करमाळा या टोकाच्या तालुक्याने कायम प्रभुत्व गाजवले आहे. कै.नामदेवराव जगताप, कै.नारायण तात्या खंडागळे, काकासाहेब निंबाळकर, अनिरूध्द कांबळे यांनी अध्यक्षपद तर कै.दादासाहेब रणदिवे, सुभाष गुळवे, राजेंद्र बारकुंड यांनी उपाध्यक्ष पद हासील केले होते. विजयसिंह मोहिते-पाटील, कै.प्रतापसिंह मोहिते-पाटील, आमदार संजयमामा शिंदे, जयमाला गायकवाड, निशीगंधा माळी, बळीराम साठे आदी दिग्गज या मिनी मंत्रालयातून पुढे आले आहेत. सध्या जिल्हा परिषद अध्यक्षाला २० हजार रूपये, उपाध्यक्षाला १५ हजार रूपये व समिती सभापतीला १२ हजार रूपये दरमहा मानधन दिले जाते.

खरंतर जिल्हाचा कारभार पहाणारी व गावातील तसेच वाडीवस्तीवर सेवा देणारी जिल्हा परिषद ही एक अत्यंत महत्वाची सेवाभावी संस्था असताना, गेल्या अनेक महिन्यापासून तिच्यावर प्रशासक असल्याने व शासनाकडून येणारे अनुदान थांबल्याने विकास थंडावला आहे. निदान वर्धापन दिनालातरी जिल्हा परिषदेचा कारभार सुरू होईल असे वाटताना शासनाच्या दुर्लक्षीतपणाने काहीच होत नाही; ही खरी खंत आहे.

## बसस्थानक आवारात सिमेंट काँक्रीटीकरण काम करण्यासाठी दोन कोटी रूपयांचा निधी



करमाळा(सं.प्र.) : करमाळा बसस्थानक आवारातील सिमेंट काँक्रीटीकरण काम करण्यासाठी दोन कोटी रूपयांचा निधी मंजूर झाला असून लवकरच काम सुरु होणार असल्याची माहिती माजी आमदार नारायण पाटील यांनी दिली. याबाबत पाटील म्हणाले, की गेली तीन वर्षे आपण या कामाचा पाठपुरावा करत होतो. पूर्वी महाविकास आघाडी सरकार असाताना आपण या कामस १ कोटी ८९ लक्ष रू. इतका निधी मंजूर करून घेतले. परंतु नंतर मात्र तांत्रिक अडचणी येत राहिल्याव कामास निविदा काढण्यात येऊनही सुरूवात झाली. यानंतर मुख्यमंत्री पदावर एकनाथ शिंदे हे विराजमान झाल्यापासून आपण या कामासाठी पाठपुरावा परत सुरू केला. पहिली मंजुरी स्थिगीती यादीत अडकल्याने नवीन प्रशासकीय मंजुरी घेऊन या कामास आता दोन कोटी रू. खर्च करता येणार असून यात करमाळा बसस्थानक आवारातील संपूर्ण भागाचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे.


**न्यु. प्रविण सुपर मार्केट**

- नं.१ २१८९ गहू - ३२ रू. किलो
- बाजरी नं.१ - ३२ रू. किलो
- ज्वारी भारी - ५०/६० रू. किलो

लाह्याची ज्वारी मिळेल.

**आरोग्यासाठी गावरान कडधान्य भाव...**

- मटकी बारीक – १३० रू. किलो
- मटकी मोठी – ९० रू. किलो
- चवळी – ८० रू. किलो
- मसुर बेस्ट – ८० रू. किलो
- वटाणा – ९० रू. किलो
- बारीक गावरान मुग – १०० रू. किलो
- पाणीपुरी वटाणा – ८० रू. किलो
- काबोली हरभरा – १०० रू. किलो
- गावरान हरभरा – ६० रू. किलो

**ड्रायफ्रुट...**

- नं.१ बदाम –६५० रू. किलो
- काजु – १६० रू. पावकिलो
- अंजीर – २५० रू. पावकिलो
- पिस्ता – २५० रू. पावकिलो
- काळा मणुका – ९० रू. पावकिलो
- मणुका भारी – ६० रू. पावकिलो
- खजुर बॉक्स – १५० किलो
- पॅकींग खजुर – ७५ रू. अर्धा किलो
- भारी खजुर – १४० रू. किलो
- महावीर पापड – ११० रू. पॅकींग
- खोबरं – १५० रू. किलो
- गावरान धने – १०० रू. किलो
- पॉपकॉर्न मका – ३० रू. पावकिलो
- पाणीपुरी – २५ रू. पावकिलो
- पाणीपुरी वटाणा – २० रू. पावकिलो
- गावरान बारीक मोहरी – ९० रू.किलो
- आरोग्यासाठी नाचणी – ७० रू. किलो

**सर्व किराणा माल होलसेल भावात मिळेल व घरपोच केलाजाईल.**

संपर्क
ज्योती-क्रांती बँकेच्या शेजारी, दत्तपेठ, करमाळा
मो.9168052318


सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

### ४० कोटी निधी मंजूर असलेल्या जलसंधारण कामावरील स्थगीती उठवली

# जलसंधारणची कामे पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा : आ.शिंदे



करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या करमाळा-माढा मतदार संघातील ४० कोटी ३४ लाख ३३ हजार ५७८ रूपये निधी मंजूर असलेल्या १५ कामांच्या निविदेवरती शिंदे-फडणवीस सरकारने स्थगिती दिलेली होती. सदर स्थगिती उठविणे संदर्भातचा निर्णय ४ ऑगस्ट रोजी झालेला असून सदर कामे पूर्ण होण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे; अशी माहिती आमदार संजयमामा शिंदे यांनी दिली. जलसंधारण महामंडळाकडून मंजूर असलेल्या पुढील कामांची स्थगिती उठलेली आहे. वडाचीवाडी येथील रूपांतरीत साठवण तलाव (४ कोटी २८ लाख ४६ हजार १८ रू.), अर्जुननगर येथील भोगे शेतगेटेड चेक डॅम (७८ लाख ६२ हजार ५२४ रू), गेटेड चेक डॅम पोथरे क्र.१ (१८ लाख ८ हजार २३ रू.), गेटेड चेक डॅम पोथरे क्र.२ (१ कोटी ५२ हजार ४३३ रू.), गेटेड चेक डॅम पोथरे क्र.३ (१ कोटी ११ लाख ७४७), गेटेड चेक डॅम पोथरे क्र.४ (३५ लाख ७४ हजार ९३५ रू.), कोर्टी धुमाळवस्ती येथील गेटेड चेक डॅम (६१ लाख ३६ हजार ४१६), भोसरे चव्हाण वस्ती येथील कोल्हापूर पध्दतीचा बंधारा (१ कोटी ६० लाख ११ हजार ४१०), लव्हे येथील रूपांतरीत साठवण तलाव ( ७ कोटी ९७ लाख ६५ हजार ३४१), घारगाव येथील रूपांतरीत साठवण तलाव (४ कोटी ९२ लाख ६८ हजार ५२४ ), भोसे येथील रूपांतरीत साठवण तलाव (६ कोटी ३ हजार ३५०), कोर्टी येथील पाझर तलाव (१ कोटी ५६ लाख ६४ लाख ४४१), जातेगाव येथील पाझर तलाव (२ कोटी १९ लाख १० हजार ७२६), आवाटी येथील पाझर तलाव पुर्नबांधणी (१ कोटी ६० लाख २५ हजार ) असा एकूण १२ गावातील १५ कामांसाठी ४० कोटी ३४ लाख ३३ हजार ५७८ रू. निधी मंजुरीवरील स्थगिती उठल्यामुळे लवकरच ही कामे पूर्ण होतील.

# वकील संघाचे माजी अध्यक्ष ॲड.आजिनाथ शिंदे यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : वकील संघाचे माजी अध्यक्ष तथा लोकभारती पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष ॲड.आजिनाथ शिंदे यांचे पहाटे दोनच्या सुमारास बारामती येथील खाजगी दवाखान्यात निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. शिंदे हे पूर्वीपासून छात्रभारती या विद्यार्थी संघटनेमध्ये कार्यरत होते. आमदार कपिल पाटील यांच्या लोकभारती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष म्हणूनही काम पाहत होते. त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.वकील संघाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना **श्रीजय नेत्र रूग्णालय**

**डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे** (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A

करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.

वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध

**श्रीजय ऑप्टिकल** (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)

श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

# योगासन स्पर्धेत चव्हाण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच यश

करमाळा(सं.प्र.) : तालुकास्तरीय शालेय योगासन स्पर्धेत यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. ही स्पर्धा महात्मा गांधी विद्यालयाच्या प्रांगणात संपन्न झाली. योगासन स्पर्धेतील विजयी स्पर्धक पुढीलप्रमाणे..योगासन रिदमिक स्पर्धा : प्रथम - अनिकेत उमेश करे (११ वी विज्ञान)., १९ वर्ष मुले योगासन स्पर्धा : प्रथम - मच्छिंद्रनाथ लोंढे (११ वी विज्ञान), व्दितीय - समाधान विठ्ठल क्षीरसागर (१२वी विज्ञान), तृतीय - किशोर सालगुडे (१२ वी विज्ञान)., १९ वर्षे मुली रिदमिक योगासन स्पर्धा : प्रथम - ऐश्वर्या आरणे (१२ वी कला), १९ वर्षे मुले रिदमिक योगासन स्पर्धा : प्रथम - गोरक्ष लोंढे (१२ वी विज्ञान), १९ वर्षे मुले आर्टिस्टिक योगासन स्पर्धा : प्रथम - किशोर सालगुडे (१२ वी विज्ञान). या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना क्रिडाशिक्षक उपप्राचार्य कॅप्टन संभाजी किर्दाक, प्रा.राम काळे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांचे अभिनंदन यशवंत परिवाराचे आधारस्तंभ विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील यांनी केले.

## जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा ११ ऑगस्ट रोजी करमाळा दौऱ्यावर

करमाळा (सं.प्र.): जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा ११ ऑगस्ट रोजी करमाळा दौऱ्यावर येणार आहेत. सकाळी १०.३५ वा पुणे विमानतळ येथून करमाळा येथील विद्या विकास मंडळाचे यशवंतराव चव्हाण महाविद्यालय येथील हॅलीपॅडवर आगमन होणार आहे. सकाळी १०.४० ते दुपारी १२.४० च्या कालावधीत ते स्व.मदनदास देवी यांच्या निवासस्थानी त्यांच्या कुटूंबियांची भेट घेणार आहेत. त्यानंतर दुपारी १ वाजता हेलिपॅडवरून पुणे विमानतळाकडे रवाना होणार आहेत.

करमाळा भूषण



कै.गिरधरदासजी देवी(भई)




आमच्या प्रशालेचे अध्यक्ष

**मा.श्री.कन्हैयालाल गिरधरदासजी देवी**

यांना दि.१६ ऑगस्ट रोजी असणाऱ्या वाढदिवसास...

हार्दिक शुभेच्छा

चेअरमन, करमाळा अर्बन बँक



शुभेच्छुक

श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित..

**श्री गिरधरदास देवी विद्यालय, करमाळा.**

● मुख्याध्यापक - श्री.संभाजी जगताप ● श्री.जयवंत नरतवडेकर ● सौ.अनिता रंदिल ● श्री.राजेंद्र चिखले ● श्री.जितेंद्र शिंदे ● श्री.अरूण नेटके ● श्री.सुहास गलांडे ● श्री.चंद्रहार खटके ● श्री.दत्तात्रय पवार ● श्री.सचिन जगताप ● श्री.शिवशंकर फुलारी ● श्री.मच्छिंद्र कांबळे ● श्री.लक्ष्मण टेकाळे ● श्री.धनंजय माने

# फसवणूक करणाऱ्या महिलेला अटक करा

## अन्यथा १४ ऑगस्ट पासून आमरण उपोषण - करमाळ्यातील महिलांचा इशारा

करमाळा (सं.प्र.) : गोड बोलून आमच्या नावावर कर्ज काढून, त्या कर्जाची फेड न करता पळून जाणाऱ्या अश्विनी उदय भालेराव यांच्या विरूध्द विश्वसघात व फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा अन्यथा आम्ही १४ ऑगस्टला तहसील कार्यालय समोर उपोषणास बसणार आहोत; असा इशारा करमाळा शहरातील १३ महिलांनी दिला आहे. या प्रकरणी महिलांनी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस प्रमुख यांना लेखी निवेदन दिले आहे.

मेघा कांबळे, साधना काळे, संध्या कुलकर्णी, संगीता वनारसे, सुजाता चोरमले, अश्विनी सावंत, अर्चना लोकरे, अस्मिता जवकर, शुभांगी वैकर, भाग्यश्री येवले, राजश्री गवळी, सुलोचना चोरमले, भारती लोकरे, पुनम खोले, सविता सुपेकर, रेश्मा शिंदे, छाया यादव यांनी जिल्हाधिकाऱ्यांना स्वतंत्र लेखी निवेदन देऊन आपण आमरण उपोषणास बसणार असल्याचे कळविले आहे. प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की अश्विनी भालेराव हिने आम्हाला विविध बँक, पतसंस्था, मायक्रो फायनान्सद्वारे कर्ज वाटप करते असे म्हणून आमच्याकडून बँकांचे व पतसंस्थांचे फॉर्म भरून घेतले. एवढेच नाहीतर आमचे कर्जही मंजूर केले. मंजूर झालेले कर्ज स्वत:च घेऊन मी त्याचे हप्ते भरते, तुम्ही काही काळजी करू नका.. असे म्हणून आमच्या नावावर लाखो रूपयाचे कर्ज घेतले आहे. त्यापैकी १० ते १५ टक्के रक्कम तिने भरलीही आहे. उर्वरित सर्व रक्कम व व्याज आम्हांस भरावे लागणार आहे. बँकांचा आमच्यामागे तगादा लागला असून, बँकांनीही आम्हाला न विचारता अश्विनी भालेराव हिच्या हातातच पैसे दिले. अशाप्रकारे बंधन बँक, ICICI बँक, लोकमंगल पतसंस्था, ग्रामीण कुट्टा तसेच IDFC, श्रीराम पतसंस्था आदी संस्थातून आमच्या नावावर लाखो रूपये कर्ज घेऊन आमची फसवणूक केली आहे. या प्रकरणी पोलीसांकडे वारंवार फेऱ्या घालूनही पोलीस या प्रकरणी दखल घेत नाहीत. तसेच तिच्यावर गुन्हा दाखल करून अटक करत नाहीत. पूर्वी एक गुन्हा दाखल झाला आहे. त्यात तिचा अटकपूर्व जामीनही नामंजूर झाला आहे. तरीही पोलीस तिला अटक करत नाहीत. अश्विनी भालेराव हिच्या विरूध्द आमच्या सर्वांचे गुन्हे दाखल होत नाही व तिला अटक होत नाही तोपर्यंत आम्ही आमरण उपोषण करणार आहोत; असाही इशारा या महिलांनी दिला आहे.

# अधिक्षक अभियंता यांनी केली पोंधवडी चारीची पाहणी

करमाळा(सं.प्र.) : पोंधवडी चारीचे काम पूर्ण झाल्यानंतर ३ ऑगस्ट पासून कुकडी प्रकल्पाचे पाणी पोंधवडी चारीसह उपचारीतून चाचणीसाठी सुरू झाले आहे. याची पाहणी करण्यासाठी पाटबंधारे विभागाचे अधिक्षक अभियंता सांगळे हे कोर्टी येथे आले होते. जागोजागी शेतकऱ्यांनी सांगळे यांचे स्वागत केले. हवालदारवाडी नजीकच्या चारीची पाहणी करून सांगळे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला.

यावेळी सेवानिवृत्त कृषी अधिकारी निळकंठ अभंग म्हणाले, की आ.संजयमामा शिंदे यांच्या प्रयत्नाने पोंधवडी चारीचे काम पूर्ण झाले असून आज कोर्टीसह इतर परिसरामध्ये शेतकऱ्यांना पाणी पाहायला मिळाले आहे. त्यामुळे शेतकरी सुखावून गेलेला आहे. असे असलेतरीही आता चाचणीसाठी आलेले पाणी भविष्यातही रोटेशनप्रमाणे मिळावे, चाऱ्यांचे अस्तरीकरण व्हावे, काही उपचारी यांची कामे अपुरी आहेत. काही चाऱ्या झाडाझुडूपांनी, मातीने बुजलेल्या आहेत. त्याच्या दुरुस्त्या व्हाव्यात. कोर्टी गावाच्या परिसरात जरी पाणी मिळत असलेतरी वनविभागाच्या अडचणींमुळे गोरेवाडी ते कोर्टी गावठाण लगत पर्यंत जाणाऱ्या ओढ्याच्या पश्चिम भागाला पाणी मिळत नसल्याने ते क्षेत्र वंचित राहत आहे. हुलगेवाडी ते शितोळे वस्तीकडे जाणाऱ्या चारीची लांबी वाढवून ते लगत असलेल्या ओढ्यामध्ये सोडल्यास आजुबाजूच्या परिसरात विहिरी व बोअरचे पाणी वाढून काही अंशी दिलासा मिळेल.

ग्रामस्थांच्या या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देताना अभियंता सांगळे म्हणाले, की याबाबत प्रस्ताव तयार करून सादर केल्यास निश्चित विचार करू; असे आश्वासन दिले. याप्रसंगी कुकडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता धायगुडे, उपअभियंता शिंदे, शाखा अभियंता श्रीरंग मेहेर, आदलिंगे, सुभाष अभंग, शिवाजी गावडे, रूपचंद गावडे,दादा गावडे, विकास गावडे, हगरे व शेतकरी उपस्थित होते.

**प्रियंका आय केअर हॉस्पीटल** डोळ्याचा दवाखाना
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
उपलब्ध सुविधा..
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदूवरील शस्त्रक्रिया.
• सुसज्ज ऑपरेशन थिएटर
• जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
• नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
• लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
पत्ता
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा.
मो.9423222266, 9604762600
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बसस्थानक शेजारी, बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा.(9527268181 / 9860872619)

**ओजस हॉस्पिटल**
OJS HOSPITAL
AlIOPATHY AYURVED HOMEOPATHY
डॉ.रोहन रामदास कुंभार B.A.M.S. M.D.(Acu) D.G.O. स्त्रीरोग तज्ञ
डॉ.मनोज रामदास कुंभार M.D. कन्सलटींग फिजीशीयन
डॉ.सौ.अंजली रोहन कुंभार B.H.M.S. होमिओपॅथिक कन्सलटंट
* वेळ : सकाळी ८ ते रात्री ८ * * २४ तास अत्यावश्यक सेवा *
डॉ.सौ.सायली मनोज कुंभार Nutritionist & Dietitian आहारतज्ञ
ॲलोपॅथी, आयुर्वेद होमिओपॅथी शास्त्रांच्या संयुक्त चिकित्सा पध्दतीने खालील आजारांवर अचूक निदान व योग्य उपचार • हृदयरोग व उच्च रक्तदाब • मधुमेह • थायरॉईड • संधिवात • पोटाचे आजार • स्त्रियांचे आजार • श्वसनसंस्थेचे आजार • मणक्यांचे व हाडांचे विकार • मुतखडा • मुळव्याध • सौंदर्य समस्या • त्वचारोग व केशविकार • आहारविषयक मार्गदर्शन • सुवर्णप्राशन संस्कार (दर महिन्यातील पुष्य नक्षत्रास)
उपलब्ध सुविधा : ECG, Multipara Monitor, Nebulisation(वाफेची सुविधा) Glucometer (रक्तातील साखर तपासणी), प्रकृतीपरिक्षण, नाडीपरिक्षण, सुवर्णबिंदू प्राशन(जन्मापासून ते १६ वर्षा पर्यंत) PAP SMEAR LBC, HPV DNA PCR, VILI & VIA Screening Test (गर्भाशय मुख कर्करोग पूर्व तपासणीसाठी पुणे येथील नामांकीत लॅब गोलविलकर मेट्रोपोलिसशी संलग्नित)
पत्ता : केकीज केक शॉपच्या वरच्या मजल्यावर, सुभाष चौक, मेनरोड, करमाळा.
• संपर्क : 9960334005, 9423333950

# डॉ.भावना पांडव-वाघ एमडी परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण



करमाळा (सं.प्र.) : करमाळा तालुका प्राथ. शिक्षक सह. पतसंस्थेचे माजी चेअरमन व चिखलठाण केंद्राचे माजी केंद्रप्रमुख भारत पांडव यांची सुकन्या डॉ.भावना भारत पांडव-वाघ ही काशीबाई नवले मेडिकल कॉलेज कात्रज पुणे येथून एमडी (मानसोपचार तज्ञ) ही परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत. डॉ.भावना यांचे एमबीबीएसचे शिक्षण बी.जे.वैद्यकिय महाविद्यालय, पुणे येथून झाले आहे. तिचे बंधू डॉ.भूषण पांडव यांनी सरस्वती धन्वंतरी डेंटल कॉलेज परभणी येथून बीडीएस शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांच्या या यशामागे मामा व माजी पंचायत समिती सदस्य मारूती सोनवणे, आई-वडील व पती डॉ.सचिन वाघ तसेच आयोडीन पद्मश्री डॉ.चंद्रकांत पांडव यांचे मार्गदर्शन लाभल्याचे सांगितले.

एमडी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल केमचे माजी सरपंच अजित तळेकर, कविटगावचे माजी सरपंच विठ्ठल चौधरी, पंचायत समितीचे माजी सभापती अतुल पाटील, माजी उपसभापती दत्ता सरडे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष आण्णासाहेब कांबळे, माजी आमदार नारायण पाटील व आयोडीन मॅन पद्मश्री डॉ.चंद्रकांत पांडव यांनी डॉ.भावना पांडव यांचे अभिनंदन केले.

# फिसरे ते सौंदे अपूर्ण रस्त्याचे काम पूर्ण करावे : भरत आवताडे



करमाळा(सं.प्र.) :नागरीकांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा व जवळचा असणारा फिसरे ते सौंदे हा चार किलोमीटरच्या रस्त्याचे राहिलेले उर्वरित काम तातडीने पूर्ण करावे; अशी मागणी उद्योजक भरत आवताडे यांनी आमदार संजयमामा शिंदे यांचेकडे केली आहे. फिसरे ते सौंदे हा चार किलोमीटरचा रस्ता या भागातील हिसरे, फिसरे, हिवरे, कोळगाव, गौंडरे, निमगाव, सालसे या भागातील नागरीकांना जेऊर येथे जाण्यासाठी अत्यंत जवळचा रस्ता आहे. या रस्त्यामुळे या भागातील व गावातील नागरीक, विद्यार्थी यांना सौंदे मार्गे जेऊर रेल्वेस्टेशनकडे जाण्यासाठी अत्यंत जवळचा मार्ग आहे. हा रस्ता झालातर नागरीकांना पुणे, मुंबई या ठिकाणी जाणे सोयीस्कर होणार आहे. सध्या हा रस्ता अपूर्ण असल्याने नागरीकांना शेलगाव व करमाळा मार्गे लांबून जावे लागत आहे. त्यामुळे नागरीकांचा वेळ वाया जात असून त्रासही सहन करावा लागत आहे.

सौंदे येथे जागृत देवस्थान बाळनाथाचे मंदिर असून येथे दरवर्षी चैत्र महिन्यात मोठी यात्रा भरते. या यात्रेला जाण्यासाठी भाविकांना हा जवळचा चांगला मार्ग आहे. फिसरे पासून अवताडे वस्ती पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण झालेले आहे. तेथून पुढे मात्र सौंदे गावापर्यंत डांबरीकरण झालेले नाही. त्यामुळे या उर्वरित रस्त्याचे काम होणे अत्यंत गरजेचे असून या कामाचा आपण आमदार संजयमामा शिंदे यांचेकडे पाठपुरावा करणार असून, तातडीने रस्ता करण्यासाठी मागणी केली आहे; असेही भरत आवताडे यांनी सांगितले.

**श्री गजानन अगरबत्ती**
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !
पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

# हर घर तिरंगासाठी पोस्ट ऑफिस सज्ज

## राष्ट्रध्वज २५ रूपयात मिळणार

करमाळा(सं.प्र.) : स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान हर घर तिरंगा अभियान राबविण्यात येत आहे. त्यानिमित्त करमाळा पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून नागरीकांसाठी अवघ्या २५ रूपयात राष्ट्रध्वज उपलब्ध करून देण्यात आला आहे. या सुवर्णसंधीचा सर्व नागरीकांनी लाभ घ्यावा; असे आवाहन पंढरपूर विभागाचे अधिक्षक श्री.भोर व करमाळा डाकघराचे पोस्ट मास्तर दत्तात्रय चेंडगे यांनी केले आहे. याबाबत माहिती देताना ते म्हणाले, की राष्ट्रध्वजासाठी करमाळा पोस्ट ऑफिस तसेच तालुक्यातील प्रत्येक पोस्ट कार्यालय व आपल्या भागातील पोस्टमनच्या मार्फत राष्ट्रध्वज देण्याची योजना राबवली आहे. त्यामुळे पोस्टमन मार्फतही राष्ट्रध्वज नागरीक खरेदी करू शकता. करमाळा कार्यालयात राष्ट्रध्वज खरेदी मोहिमेचा शुभारंभ नुकताच करण्यात आला आहे. तरी नागरीकांनी २५ रूपयात राष्ट्रध्वज घेऊन राष्ट्र कार्यासाठी सहकार्य करावे; असे आवाहन डाक कार्यालयाने केले आहे.

## शेलगाव(वांगी) येथे केळी संशोधन केंद्र होण्यासाठी

# आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांना निवेदन

करमाळा(सं.प्र.) : विधान परिषदेत उपस्थित केलेल्या चर्चेनुसार सोलापूर जिल्ह्यातील शेलगाव(वांगी) येथे कृषी विभाग महाराष्ट्र शासन फळ रोपवाटिका व महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत कोरडवाहू संशोधन केंद्र अशा एकूण १०० एकर जागेपैकी उपलब्ध जागेत केळी संशोधन केंद्र स्थापन करण्यात यावे. या संदर्भात विधानपरिषद सदस्य रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. यावर तात्काळ प्रस्ताव सादर करावा; अशी सूचना कृषीमंत्री यांनी संबंधित विभागाकडे केली आहे. पावसाळी अधिवेशन दरम्यान मंत्रीमंडळात पुरवणी मागण्यावर झालेल्या चर्चेवेळी शेलगाव(वांगी) येथे केळी संशोधन केंद्र स्थापन करण्याची मागणी मोहिते-पाटील यांनी केली होती. राज्यात केळी पिकाखालील क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. देशात ३ कोटी टन केळीचे उत्पादन दरवर्षी होते. त्यामध्ये महाराष्ट्र राज्याचा १४ टक्के वाटा आहे. तसेच महाराष्ट्रात सर्वाधिक निर्यातक्षम केळीचे उत्पादन होते. सोलापूर जिल्ह्यात सुमारे १५ हजार हेक्टर क्षेत्र केळी पिकाखाली आहे. केळी निर्यातीच्या दृष्टीकोनातून विचार करता देशात एकूण केळी निर्यातीपैकी १ लाख ६३ हजार टन केळीची निर्यात महाराष्ट्रातून होते. त्यामध्ये सोलापूर जिल्ह्याचा ५० टक्के वाटा आहे. राज्यात केळी पिकावर संशोधन करणारे केळी संशोधन केंद्र जळगाव आणि नांदेड येथे कार्यरत आहे. या केंद्राच्या माध्यमातून केळी उत्पादक शेतकऱ्यांना अनेक संशोधनपर महत्वाच्या शिफारशी देऊन एकूण विक्रमी केळी उत्पादनात मोलाचा वाटा उचलला आहे. या भागातील हवामान मृदा परिक्षण, केळीच्या विविध वाणांचा संग्रह करून अभ्यास करणे, केळी लागवडीसाठी संपूर्ण तंत्रज्ञान विकसित करणे, केळीसाठी लागणाऱ्या अन्नद्रव्यांची मात्रा ठरवणे, रोग व किडीचे व्यवस्थापन, शिक्षण आणि प्रशिक्षण यादृष्टीने अभ्यास आणि उपाययोजना करण्यासाठी शेलगाव (वांगी) येथे कृषी विभाग महाराष्ट्र शासन फळ रोपवाटिका व म.फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत कोरडवाहू संशोधन केंद्र १०० एकर जागेपैकी उपलब्ध जागेवर स्थापन करण्यास मंजुरी देण्यात यावी.

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल
कोर्टा समोर, सुवर्ण मेडिकल शेजारी, परांडा चौक, बार्शी. मो.९७६७८९९५७१
उपलब्ध सुविधा...
- मुळव्याधवर इंजेक्शन
- डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे
- संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे
- संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे
- भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
टीप..
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणीपूर्वी नावनोंदणी आवश्यक
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई

● नांवनोंदणीसाठी संपर्क : मो.9405675887

# स्व.मदनदासजी देवी यांना श्रध्दांजली वाहण्याचा कार्यक्रम संपन्न



करमाळा(सं.प्र.) : करमाळा येथे विकी मंगल कार्यालयात सामाजिक कार्यकर्ते गिरीष प्रभुने यांच्या मुख्य उपस्थितीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सह सरकार्यवाह व अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे माजी संघटनमंत्री मदनदासजी देवी यांना श्रध्दांजली वाहण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी संघाचे प्रतिनिधी तसेच देवी परिवार यांचेसह भाजपाचे नेते धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार संजयमामा शिंदे, माजी आमदार नारायण पाटील, युवा नेते शंभुराजे जगताप, भाजपाचे राजकुमार पाटील, तालुका अध्यक्ष गणेश चिवटे, विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, सामाजिक कार्यकर्ते श्रेणिकशेठ खाटेर, बाजार समितीचे सभापती प्रा.शिवाजीराव बंडगर, माजी प्राचार्य जयप्रकाश बिले, सामाजिक कार्यकर्ते रामकृष्ण माने, भालचंद्र पाठक, भाजपाचे शहराध्यक्ष जगदीश आगरवाल, डॉ.अमोल घाडगे, पंचायत समितीचे माजी सभापती अतुल पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्व.मदनदासजी यांच्याबद्दल भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे बाबासाहेब फंड यांनी केले.

सनराईज इंग्लिश क्लासेस
Center of excellence in English
इयत्ता १ ली ते १० वी पर्यंत. (मराठी / सेमी / इंग्रजी / सी.बी.एस.ई. माध्यम)
क्लासची वैशिष्ट्ये
- प्रशस्त हॉल
- डिजिटल क्लास ची संकल्पना
- संपूर्ण क्लास CCTV कॅमेऱ्याच्या कक्षेत
- प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र आसन व्यवस्था
- मनोरंजनात्मक शिक्षण
- फक्त पुस्तकीज्ञानापेक्षा इतर प्रभावी ज्ञानावर भर
- नियमीत चाचणी परीक्षा
- विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व अभ्यासासाठी प्रेरणा
- विद्यार्थ्यांचा इंग्लिश विषयाचा परिपूर्ण आणि सर्वांगीण विकास
- ॲक्टिव्हिटी बेस शिक्षण
- व्यवहारीक व दैनंदिन उदाहरणातून स्पष्टीकरण
- अवघड असणाऱ्या इंग्रजी विषयाचे सोप्या पध्दतीत स्पष्टीकरण
- विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाची आवड निर्मिती
- क्लुप्त्या वापरुन व्याकरणाचे स्पष्टीकरण
- विद्यार्थ्यांचे समुपदेशन व प्रत्येक शनिवारी मास्टर क्लास
- इंग्रजीतुन संवाद व संभाषण यावर भर
- सभाधिटपणा येण्यासाठी विशेष तयारी
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार विद्यार्थ्यांची तयारी
स्पोकन इंग्लिशची स्पेशल बॅच - बेसिक, इंटरमेडिएट व ॲडव्हान्स कोर्सेस
मुजावर सर 9423732646
स्थळ :- ''आदित्य प्लाझा'',भवानी नाक्याजवळ, संताजी नगर, करमाळा जि.सोलापूर

महाराष्ट्रात प्रथमच...

गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामूक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !
२ चाकी | ३ चाकी | ४ चाकी | ट्रक | ट्रॅक्टर | JCB | पोक्लेन | सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

आशिर्वाद

संचालक, आदिनाथ कारखाना

डॉ.हरिदास केवारे
संचालक, कमलाई मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉ.

डॉ.गौतम रोडे
आशिर्वाद

स्व.सुभाष(आण्णा) सावंत
कमलाई मिल्क ॲन्ड मिल्क प्रोडक्टस्, करमाळा च्या
प्रथम वर्धापन
दिनानिमित्त पुढील वाटचालीस
हार्दिक शुभेच्छा !
11 ऑगस्ट
शुभेच्छुक माधव तिडके, साजिद शेख, दादा फुके, अभय दिक्षित, अतुल ढेरे, शुभम शिंदे, सलमान शेख, विशाल शिंदे, हनुमंत रायकर, शब्बीर मनियार, रोहन गरड, निखिल रोडे

# हार्दिक शुभेच्छा !

आशिर्वाद



॥ श्री कमलादेवी प्रसन्न ॥

संचालक, आदिनाथ कारखाना



डॉ.हरिदास केवारे

जिल्हाप्रमुख, शिवसेना



मा.श्री.महेश चिवटे

चेअरमन, वि.का.से.सो.आळजापूर



डॉ.दिपक केवारे

आशिर्वाद



स्व.सुभाष(आण्णा) सावंत



संचालक, कमलाई मिल्क अँन्ड मिल्क प्रॉ.




डॉ.गौतम रोडे

**कमलाई मिल्क अँन्ड मिल्क प्रोडक्टस्** यांचे ११ ऑगस्ट रोजी असलेल्या प्रथम वर्धापन दिनास व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

● जय हनुमान दुध उत्पादक संस्था, आळजापूर ✻ जगदंबा महिला दुध उत्पादक संस्था, आळजापूर ✻ व्ही.के.महिला बचत गट, आळजापूर





# आण्णा....

तुमच्या स्मृतींने घेऊ स्फुर्ती..
तुमच्या सत्कार्याची करू पूर्ती..
आमच्या हृदयी तुमची मुर्ती

गोरगरीबांचे कैवारी व कामगार नेते

## स्व.सुभाष(आण्णा) सावंत

यांच्या ९ व्या स्मृतीदिनानिमित्त...

14 ऑगस्ट

भावपूर्ण आदरांजली

पुण्यतिथीनिमित्त..

● रक्तदान शिबीर ● आरोग्य शिबीर
वेळ : सकाळी ९.०० ते ४.००

स्थळ : हमालभवन, पोथरनाका, करमाळा.

अभिवादक



स्व.सुभाष(आण्णा) सावंत
नागरी सह.पतसंस्था मर्या; करमाळा.
चेअरमन, व्हा.चेअरमन, सचिव व सर्व संचालक
हमाल पंचायत, करमाळा तालुका

# नागराज
## मशिनरी स्टोअर्स

**शेटफळ, ता.करमाळा, जि.सोलापूर**

**करमाळा शाखा क्र.२ :** श्री कमलादेवी औद्योगिक वसाहत, गाळा नं.७, ८ मौलालीमाळ, करमाळा.

नवीन करमाळा शाखेचा दि.१८ ऑगस्ट २०२३ पासून


## शुभारंभ

- केळी, डाळींब व पपईचे रोपे मिळतील.
- जैन ठिबक, पीव्हीसी पाईप फिटींग साहित्य
- नामांकीत कंपनीचे शेतीपंप, सबमर्सिबल पंप योग्य दरात मिळेल.

**प्रोप्रा : किरण पोळ** (8605961155)
**वैभव पोळ** (9890462836)

JAIN
Jain Irrigation Systems Ltd.

अधिकृत विक्रेते...
## जैन इरिगेशन सिस्टिम लि;



जुने ठिबक देऊन नवीन ठिबक मिळेल

- नागराज ठिबक
- पीव्हीसी पाईप

होलसेल दरात मिळतील.



शासकीय अनुदान प्राप्त जैन पाईप, ठिबक तसेच जैन टिश्युकल्चरची केळी रोपे मिळतील.






# ॥ तृतीय पुण्यस्मरण ॥



स्व.विश्वनाथ बेलु कटकदौंड गुरूजी
(मृत्यू दि.१२/८/२०२०)

वाटले नव्हते कोणासही
असे घडून येईल !
चालता बोलता देव तुम्हाला
ऐसे नेईल !
माणुसकी.., स्नेह..,
आधार.., मायेची..
ज्यावेळी चर्चा होईल
त्यावेळी सर्वात पहिली
तुमचीच आठवण येईल !

**स्व.विश्वनाथ बेलु कटकदौंड (गुरूजी)**
यांच्या दि.१२ ऑगस्ट रोजी असलेल्या
तृतीय स्मृतीदिनानिमित्त

## भावपूर्ण आदरांजली

आपले
**कटकदौंड, इंगळे परिवार**
करमाळा., जि.सोलापूर



विश्वासास पात्र ठरलेले..

# शिवम
## शुभ मंगल भांडार



आपल्याकडे लग्न समारंभ, वाढदिवस, साखरपुडा या सर्व शुभकार्यासाठी भांडे मिळतील. तसेच गादी, खुर्ची, टेबल, चटई, सतरंजी इ. सर्व सामान योग्य दरात भाड्याने मिळेल..!

प्रोप्रा : संतोष टांगडे (9860760182)
प्रोप्रा : शिवम टांगडे (9766291345)

**पत्ता : दत्तपेठ, करमाळा., जि.सोलापूर.**

## बिबट्या संदर्भात आ.शिंदे यांनी वनअधिकाऱ्यांना कॅमेरा बसविण्याच्या केल्या सूचना





करमाळा(सं.प्र.) : मांगी येथील परिसरात ९ ऑगस्ट रोजी रात्री पुन्हा येथे बिबट्याने नागेश बागल यांच्या वारसावर हल्ला करून वासरू फस्त केले. यामुळे या परिसरातील नागरीकांवर भीतीचे वातावरण पसरले आहे. या घटनेची पाहणी करण्यासाठी आमदार संजयमामा शिंदे यांनी मांगी येथे बिबट्याने हल्ला केलेल्या नागेश बागल यांच्या शेतात भेट दिली व वन विभागाचे अधिकारी यांच्याशी चर्चा करून त्यांना कॅमेरे बसविण्याच्या सूचना दिल्या व पिंजरे वाढीव बसविण्यास सांगितले. यावेळी आ.शिंदे यांनी लावलेला पिंजरा पाहणी करून पिंजऱ्याची संख्या वाढविण्यात यावी; असे सांगितले. तसेच प्रत्येक ठिकाणी कॅमेरा बसविण्यात यावे; अशाही सूचना आ.शिंदे यांनी वनविभाग अधिकाऱ्यांना केल्या आहेत. याप्रसंगी वनविभागाचे अधिकारी श्री.लटके, कुरले, सुजित बागल, अभिमान अवचर, तुषार शिंदे, सुरज ढेरे, आदेश बागल, नागेश बागल, आकाश शिंदे, मनोज शिंदे व शेतकरी उपस्थित होते.


# म्हशीचे शेणखत
## विकणे आहे

संपर्क : 8459723321, 7522934272

पत्ता : मच्छिंद्र मावलकर, मावलकर वस्ती, झरे, ता.करमाळा.


## बिबट्याचा बंदोबस्त करा - दिग्विजय बागल यांची मागणी



करमाळा(स.प्र.) : मांगी येथे बिबट्याच्या हल्ल्यात वासरू ठार झाले असून या भागातील शेतकरी व नागरीकांमध्ये भितीचे वातरण आहे. मोहोळ आणि सोलापूर येथील वन अधिकारी यांनी नागेश बागल यांच्या वासरावर हल्ला केला त्या ठिकाणी भेट देऊन पाहणी केली. यावेळी दिग्विजय बागल यांनी वनपरिक्षेत्रातील लटके आणि त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांशी चर्चा करून पिंजऱ्यांची संख्या वाढवावी तसेच ड्रोण द्वारा बिबट्याचा शोध घेऊन ग्रामस्थांना तात्काळ दिलासा द्यावा; अशी मागणी केली. मागील वर्षी अंजनडोह येथे बिबट्याने माजवलेला हाहाकार च्या आठवणी ताज्या असल्याने प्रशासनाने योग्य ती खबरदारी घ्यावी; अशी मागणी मकाईचे माजी चेअरमन दिग्विजय बागल यांनी केली आहे.

# ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सह सरकार्यवाह, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे माजी संघटनमंत्री, थोर तत्त्वचिंतक व संघटक, करमाळ्याचे रहिवाशी असलेले

## स्व.मदनदासजी देवी यांचे

नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांचे परिवाराचे दु:खात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो हीच आमची भावपूर्ण श्रध्दांजली !

**अभिवादक**

**प्रविण दत्तात्रय गायकवाड, श्रीपाद काशिनाथ जोशी**
**अमोल बबन ढवळे, करमाळा.**




॥ श्री कमलादेवी प्रसन्न ॥

**कमलाई मिल्क ॲन्ड मिल्क प्रोडक्टस्, करमाळा च्या**
# प्रथम वर्धापन
दिनानिमित्त पुढील वाटचालीस
## हार्दिक शुभेच्छा !

11 ऑगस्ट

संचालक, आदिनाथ कारखाना



डॉ.हरिदास केवारे

चेअरमन, मकाई स.सा.कारखाना



श्री.दिनेश भांडवलकर

संचालक, कमलाई मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉ.



डॉ.गौतम रोडे

शुभेच्छुक

**जय भवानी महिला दुध उत्पादक संस्था, वडगाव(द)**
नारायण भांडवलकर, राजेंद्र कल्याण रोडगे

# भाविकांच्या आनंदासाठी तीर्थयात्रा सुरू - श्रेणिकशेठ खाटेर

करमाळा : भाविकांना एक वेगळ्या प्रकारचा आनंद देण्यासाठीच आपण मोफत तीर्थक्षेत्र यात्रा सुरू केली आहे. आत्तापर्यंत चार ट्रिपा झाल्या असून, त्यातील चौथ्या ट्रिपला दोन बसेस व एक मिनी बस या माध्यमातून १२७ भाविकांना नेले होते.

या तीर्थयात्रेसाठी अगोदर नांवनोंदणी करावी लागते. त्यासाठी आधारकार्ड, फोटो द्यावे लागतात. हे काम विजय बरीदे, प्रितम राठोड, सतीश शिंदे, गिरीश शहा यांचेबरोबरच ॲड.संकेत खाटेर, वर्धमान खाटेर, सौ.मोक्षा खाटेर हे सुध्दा या कामात मदत करतात. बस निघाल्यापासून ते परत येईपर्यंत छोट्या-छोट्या गोष्टीपासून ते महत्वाच्या बाबीपर्यंत खाटेर परिवार लक्ष देऊन सर्व कामे परिपूर्ण करतात. याचा होणारा खर्च खाटेर परिवार स्वत: करत असून किमान दहा ट्रिपा काढण्याचे सध्याचे नियोजन असल्याचे शिक्षणापूर-गोंदवले तीर्थयात्रा समितीचे संयोजक श्रेणिकशेठ खाटेर यांनी सांगितले.





या तीर्थयात्रेमुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील भाविक एकत्र येतात. प्रवासात भजन, अभंग, इतर धार्मिक गीते सादर करून आनंद व्यक्त केला जातो. रस्त्यात एकत्र बसून ओळखीचा कार्यक्रम होतो. विचाराची देवाण-घेवाण आणि यातूनच माणसं जोडले जातात आणि चांगल्या कार्याला पाठबळ मिळते. यापूर्वी वेगवेगळ्या कथा सादर केल्या, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर, गोशाळेचा उपक्रम याबरोबरच तीर्थयात्रेला जाण्याचा उपक्रम हाती घ्यावे असे वाटले व हा उपक्रम सुरू केला आहे. दर पौर्णिमेला बस मध्ये ४५ भाविकांना घेऊन जातो. प्रत्येकाचे आधारकार्ड घेतले जाते. फोटो घेऊन त्याचे ओळखपत्रही भाविकांना दिले जाते. आजपर्यंतच्या प्रत्येक यात्रेनंतर भाविकांना तर आनंद होतोच, पण आम्हां खाटेर परिवारासही मोठा आनंद होतो.

**...श्री.श्रेणिकशेठ खाटेर**
**(संयोजक, शिंगणापूर-गोंदवले तीर्थयात्रा समिती)**

दर पौर्णिमेला करमाळा ते नीरानृसिंहपूर (संगम), त्यानंतर अकलुज येथील अकलाई देवी मंदिर (भाविकांना नाष्टा दिला जातो), आनंदी गणेश मंदिर., त्यानंतर शिखर-शिंगणापूर येथील गुप्तलिंग, त्यानंतर प्रत्यक्ष शिंगणापूर येथील महादेव दर्शन. तेथे देवाला अभिषेक, महाप्रसाद. त्यानंतर गोंदवले येथे जाऊन सुरूवातीला नामस्मरण, त्यानंतर सायंकाळी सात ते आठ आरती, दर्शन व त्यानंतर महाप्रसाद घेऊन बस परत नियते. रात्री बाराच्या आत करमाळा येथे पोहोचते.



करमाळा शहरातील महिला परिवार किंवा आपल्या मैत्रिणी सोबत बाहेर पडतात, परंतु मोठ्या संख्येने वेगवेगळ्या परिवार मधील महिला एकत्र येऊन कोणत्याही तीर्थयात्रेला जाऊ शकत नाहीत. त्यामुळे आम्ही हा उपक्रम सुरू केला असून करमाळा शहरातील वेगवेगळ्या भागातील महिला या तीर्थयात्रेत सहभागी होत असल्याने सर्वांची विचारधारा जुळते व मैत्री वाढते आणि एक वेगळा आनंद मिळतो. यामुळे हे काम आम्ही उत्साहाने करत आहोत.

**...सौ.संगीता श्रेणिक खाटेर**
**(मा.नगरसेविका, क.न.प.)**

अधिकमास निमित्ताने खाटेर यांचेसोबत शिखरशिंगणापूर यात्रेला जाण्याचा योग आला. खूप सुंदर नियोजन आणि अटोपशीर व्यवस्था, न भेटणारे आपले स्नेही या यात्रेत भेटले. समाजासाठी नेमके काय करावे व समाजाला नेमका आनंद कसा द्यावा.. याचे सुंदर नियोजन श्रेणिकशेठ खाटेर व सौ.संगीता खाटेर यांचेकडे आहे. त्यांचे आम्ही मनापासून आभारी आहोत.

**...डी.के.पासंगराव/नाथाजीराव शिंदे, करमाळा.**


॥ श्री कमलादेवी प्रसन्न ॥

चंदूलाल यांचे 75 वर्षांची परंपरा
हलवाई स्वीट होम

ग्राहकांच्या पसंतीस उतरलेले
व विश्वासास पात्र ठरलेले
**स्वादीष्ट व चवीष्ट..**
**हलवाई स्वीट होम**
एका नव्या रूपात सुरू होत आहे..!

आशिर्वाद



आशिर्वाद



**शुभारंभ** सोहळ्यानिमित्त
रविवार, दि.१३/८/२०२३ रोजी
**सत्यनारायण पुजा**
आयोजित करण्यात आली आहे. तरी तीर्थप्रसादासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे, ही विनंती !

**'हलवाई स्वीट होम' चे प्रॉडक्ट**

- बंदी लाडू
- मोतीचूर लाडू
- बेसन लाडू
- गुडीशेव
- जामुन
- म्हैसूर
- बालूशाही
- खुर्मा • पेढा
- जिलेबी
- शेवफरसाण
- पनीर
- श्रीखंड
- दही

सर्व प्रकारचे बेकरी प्रॉडक्ट व कोल्ड्रींक्स मिळतील

**निमंत्रक**
- श्रीमती शोभा चंदुलाल परदेशी(हलवाई)
- श्री.विवेक चंदुलाल परदेशी(हलवाई)
- श्री.समीर चंदुलाल परदेशी(हलवाई)
- श्री.धनराज चंदुलाल परदेशी(हलवाई)

**समस्त परदेशी (हलवाई) परिवार, करमाळा.**

**टीप :** सर्वांना निमंत्रण पत्रिका दिलेल्या आहेतच. नजरचुकीने कोणास निमंत्रण पत्रिका मिळाली नसल्यास हेच निमंत्रण समजून तीर्थप्रसादास अगत्य येण्याचे करावे, ही विनंती !

**पत्ता : सुभाष चौक, राशिनपेठ, करमाळा.**

# कार्यकर्ता असावा तर असा..!

**पाय असावे जमिनीवरती कवेत अंबर घेताना..., हसू असावे ओठावरती काळजी काढून देताना..., संकटासही ठणकावून सांगावे..., आता ये बेहत्तर नजर रोखुनी नजरेमध्ये आयुष्याला द्यावे उत्तर...!** कवी वि.दा. करंदीकर यांच्या आयुष्याला द्यावे उत्तर या कवितेतील या ओळी आहेत. अशाचप्रकारे काही कार्यकर्ते आपले जीवन जगत असतात. घरच्यांसाठी थोडं पण इतरांसाठी सर्वस्व अशी भुमिका ठेवून दैनंदिन वाटचाल करत असतात. खरंतर असे काही लोक असतात म्हणूनच समाज चालत असतो हे सत्य आहे. अशाचप्रकारे आपली वाटचाल करणारे शेटफळ(ना), ता.करमाळा येथील गजेंद्र (बाबु) नागनाथ पोळ हे एक कार्यकर्ते आहेत. शेटफळ आणि परिसरात सामाजिक काम म्हटलं की गजेंद्र पोळ यांची आठवण येतेच. अशाप्रकारे गेल्या २५ वर्षापासूनचे समीकरण आहे.



गजेंद्र पोळ यांचे बालपण, प्राथमिक शिक्षण हे शेटफळ येथे झाले. पोळ गुरूजी आणि जाधव गुरूजी यांचा आदर्श समोर ठेवून ते शिकत राहिले. आठवी ते बारावी हे शिक्षण भारत हायस्कुल जेऊरला पूर्ण केले. त्यानंतर खरंतर त्यांना पोलीस खात्यात जायचं होतं. त्यासाठी त्यांनी पुढील महाविद्यालयीन शिक्षण थांबवलं. त्यांचे आजोळ बोरगाव, ता.करमाळा हे असून, त्यांचे मामा मारूती गायकवाड, भिमराव गायकवाड व अशोक गायकवाड हे आहेत. यापैकी पुणे येथे पोलीस खात्यात अशोक गायकवाड व मारूती गायकवाड हे असल्याने त्यांचे पुणे येथे जाणे-येणे वाढले. पोलीस भरतीसाठी प्रयत्नही झाला, पण मनात पोलीस भरतीपेक्षाही गावात राहून सामाजिक काम करावं ही त्यांची भावना. त्यामुळे त्यांनी पोलीस खात्यात जाण्याचा बेत रद्द केला. गावातच शेती, गायीचा व्यवसाय सुरू केला आणि मुक्त विद्यापीठातून राहिलेली पदवी मिळवली.

सामाजिक कार्याच्या वारसातून त्यांनी दैनिक सकाळ चे पत्रकार म्हणूनही काम सुरू केले. दरम्यान सन २००५ मध्ये मकाई सहकारी साखर कारखान्याकडे स्लीप बॉय म्हणून नोकरीचा आरंभ केला. आता ते ओव्हरशियर म्हणून काम करतात. या वाटचालीत गावातील अनेक युवकांच्या अडीअडचणीला धावून जाणे, सर्वसामान्यांना मदत करणे, शेतीपासून ते उद्योगापर्यंत लागेल त्यास पाठबळ देणे ही कामे सुरू केली. यातूनच ग्रामसुधार समितीच्या माध्यमातून नेहरू युवा केंद्र स्थापन, त्यातून दारूबंदी तर आदरणीय भालचंद्र पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राहक पंचायतचे काम सुरू केले. हे सर्व होत असतानाच म्हणजे शेती, पत्रकारिता, नोकरी, शेतीपुरक गायी व्यवसाय याबरोबरच युवकांना एकत्र करून नागनाथ शेतकरी गट स्थापन केला. त्यातून शेतकऱ्यांना वेगवेगळ्या पध्दतीचं मार्गदर्शन, शासनाचे अनुदान, पीक पध्दतीत बदल ही कामे सुरू केली. गावात वेगवेगळे परिसंवाद व सातत्याने उत्साहवर्धक उपक्रम राबवून गावाचा चेहरा-मोहरा पूर्णत: बदलून टाकला आहे. याबरोबरच लोकविकास फार्मस प्रोड्युसर कंपनी स्थापन करून त्यातूनही शेतकरी उभा करण्याचे काम केले आहे. अर्धा एकर जागा खरेदी करून त्यामध्ये शेड उभे केले आहे. शासनाचे अनुदान मिळवत या कंपनीच्या माध्यमातून गावात एक नवपरिवर्तन निर्माण झाले आहे. गावातील दु:खद प्रसंग असेल तर कधी सुखद प्रसंग असेल किंवा यश मिळवणाऱ्या युवक-युवतींच्या पाठीवर थाप मारण्याचे काम असेल त्यावेळी गजेंद्र पोळ आणि त्यांचा मित्रपरिवार कायम हजर असतो.

त्यांच्या या वाटचालीसाठी त्यांच्या सौभाग्यवती प्रतिभा यांचे मोठे योगदान आहे. आपल्या पतीच्या प्रत्येक निर्णयात त्या मोठ्या उत्साहाने पाठबळ देतात. आज वयाच्या ४५ मध्येही ते जास्तीत जास्त कालावधी गाव आणि गावातील व्यक्तींसाठी देतात. त्यांचे वडील नागनाथ पोळ व आई सौ.अहिल्या पोळ तसेच बंधू गंगाधर पोळ यांचे पाठबळ मोठे आहे. म्हणूनच असे काम करता येते. याबरोबरच चुलते साहेबराव पोळ, आजिनाथ पोळ, चुलत बंधू अंकुश पोळ, लहू पोळ, शशिकांत पोळ यांची मिळालेली साथ महत्वाची आहे. त्यांच्या भगिणी छाया धनाजी वीर रा.भाटनिमगाव याही अधूनमधून आपल्या भावाच्या निमंत्रणावरून गावच्या सामाजिक उपक्रमात सहभागी राहतात. प्रशांत नाईकनवरे हे गजेंद्र पोळ यांची सावली म्हटलंतर वावगं ठरणार नाही. अशाचप्रकारचे नानासाहेब साळुंके, वैभव पोळ, राजेंद्र साबळे, विजय लबडे, प्रमोद मोरे आदी मित्र त्यांच्या सोबत कार्यरत आहेत. पोळ यांना संदेश हा मोठा मुलगा असून तो इचलकरंजी येथे इंजिनिअरींगचे शिक्षण घेतो तर छोटा करण हा भारत महाविद्यालयात प्रथम वर्षाला शिक्षण घेत आहे. एक आदर्श परिवार हाच गावाला आदर्श करू शकतो, याचे मुर्तीमंत उदाहरण म्हणजे पोळ परिवार आहे.

***


# हार्दिक शुभेच्छा



आशिर्वाद



स्व.सुभाष(आण्णा) सावंत

संचालक, आदिनाथ कारखाना



डॉ.हरिदास केवारे

चेअरमन, वि.का.से.सो.आळजापूर



डॉ.दिपक केवारे

संचालक, कमलाई मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉ.



डॉ.गौतम रोडे

**कमलाई मिल्क ॲन्ड मिल्क प्रोडक्टस्, करमाळा** च्या दि.११ ऑगस्ट रोजी असलेल्या प्रथम वर्धापन दिनास व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

**श्रीमंत काळे, आण्णा रोडे, दत्ता टेंबाळे, अमोल गपाट, नवनाथ वाकळे, विनोद नवले, युवराज रोडे राजेंद्र रोडे, सुनील काळे, बापू काळे, अशोक काळे, प्रदीप पाटील, रितेश काळे, भरत रोडे, विकास पाटील, अमोल वाघमोडे काकासाहेब रोडे, सोनू काळे, महादेव रोडे, आप्पा काळे**

**अॅड.सचिन बाबूराव हिरडे**
बी.ए.एलएल.बी. एम.सी.जे. अॅडव्होकेट
वेताळपेठ, करमाळा, जि.सोलापूर

## जाहीर नोटीसीस उत्तर

तमाम सोलापूर जिल्ह्यातील नागरीकांना व विशेषत: करमाळा शहर व तालुक्यातील नागरीकांना कळविणेत येते की.. करमाळा शहरातील सिटी सर्व्हे नं.३२२८, ३२२७, ३२५३, ३२४३ या जागेबाबत श्री.बलराज बालमुकूंद परदेशी यांच्या वतीने अॅड.शिरीषकुमार भा. लोणकर यांनी सा.कमलाभवानी संदेश मध्ये दि.४/८/२०२३ रोजीच्या अंकात पान नं.९ वर दिलेल्या जाहीर नोटीसीस उत्तर देण्यात येते ते पुढीलप्रमाणे... यातील श्री.बलराज परदेशी यांनी करमाळा शहरातील सिटी सर्व्हेनं.३२२७, क्षेत्र – १६९.१० चौ.मी., सिटी सर्व्हेनं.३२२८ क्षेत्र – ३८४.८० चौ.मी., सिटी सर्व्हेनं.३२४३ क्षेत्र – ४४०.०० चौ.मी., सिटी सर्व्हेनं.३२५३ क्षेत्र – ४५८.५० चौ.मी. या मिळकतीबाबत जी जाहीर नोटीस दिलेली आहे. या सर्व मिळकती आमचे अशिल व बलराज परदेशी यांच्या वाडवडिलार्जित मिळकती आहेत. सदरच्या मिळकती मध्ये प्रेम गोवर्धन परदेशी, रंजना उत्तमसिंग परदेशी, सीता अरूण गोटे, कमल सुरेशसिंग परदेशी, आशा बलराम परदेशी, धनुबाई मन्नालाल कोकाश, संतोषी वैभवसिंग परदेशी व बलराज बालमुकूंद परदेशी या सर्वांच्या मालकीच्या व वहिवाटीच्या मिळकती आहेत. असे असताना श्री.बलराज परदेशी यांनी या सर्व मिळकतीचे आपण एकटेच मालक आहोत, अशा स्वरूपात सदरची जाहीर नोटीस दिलेली आहे. ती पूर्णत: बेकायदेशीर असून आमचे अशिलावर मुळीच बंधनकारक नाही. समाईकातील सिटी सर्व्हेनं.३२५३ मधील खुली जागा २४ X २४ ही मिळकत आमचे अशिलाच्या परस्पर अनामत रक्कम घेऊन व्यवसायासाठी विशाल सुरेशसिंग परदेशी यांना भाड्याने दिली आहे. या कृती पूर्णत: बेकायदेशीर असून आमचे अशिल त्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करणार आहेतच. सदर मिळकतीत आमच्या अशिलांचा ७/८ असा समाईकात मालकी हक्क असून तशी त्यांची कब्जेवहिवाट आहे. याबाबत यातील बलराज परदेशी यांना कोणत्याही प्रकारे जाहीर नोटीस देऊन हरकत घेता येणार नाही. आमचे अशिलाच्या असलेल्या कायदेशीर मिळकतीबाबत आमचे अशिल योग्य तो निर्णय घेतील. याबाबत श्री.बलराज परदेशी यांना कोणत्याही प्रकारे हरकत, अडथळा करता येणार नाही. सबब बलराज परदेशी यांनी दिलेल्या नोटीसीतील मजकूरामुळे कोणाचा गैरसमज होऊ नये.. या उदात्त हेतूने सदरच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.. आमच्या अशिलांचा वरील मिळकतीत ७/८ हिस्सा आहे. त्याबाबत बलराज परदेशी यांची हरकत असल्यास अथवा मालक नाही, असे म्हणणे असल्यास तसा त्यांनी पुरावा द्यावा. अन्यथा सात दिवसात आमचे अशिल यांच्या हिस्स्याचा योग्य तो विनीयोग करू शकतात. त्यास त्यांना कोणत्याही प्रकारे हरकत, अडथळा करता येणार नाही अथवा जाहीर प्रसिध्दीकरण करून कोणाचा गैरसमज करता येणार नाही व कोणी तसा गैरसमज करून घेऊ नये. याबाबत सदर जाहीर नोटीसीस उत्तर देण्यात येत आहे. ता.११/८/२०२३

**अशिला तर्फे अॅडव्होकेट**

# टेम्पोची पिकअपला धडक - टेम्पो गेला हार्डवेअरच्या दुकानात

करमाळा(सं.प्र.) : वांगी नं.३ येथील पिकअप नगरकडे जात असताना करमाळा बायपास रस्त्यावर भरधाव टेम्पोने पिकअपला धडक दिल्याने झालेल्या अपघातात टेम्पो थेट हार्डवेअरच्या दुकानात गेला. हा प्रकार ६ ऑगस्टला दुपारी साडेबाराच्या सुमारास घडला. या प्रकरणी सुनील निवृत्ती ढावरे (रा.वांगी नं.३, ता.करमाळा) याने फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ६ ऑगस्टला सकाळी पावणेअकरा वाजता मी वांगी नं.३ येथून नगरकडे माशांचे खाद्य आणण्यासाठी पीकअप नं.एमएच ४२ एआर ७०२७ घेऊन निघालो होतो. त्यावेळी करमाळा बायपास रस्त्यावर घाडगे हार्डवेअर समोर विना नंबरचा आयसर कंपनीचा टेम्पो भरधाव वेगात आला व त्याने पिकअपला जोराची धडक दिली. आणि पुढे हा टेम्पो हार्डवेअरच्या दुकानच्या लोखंडी गेटला जाऊन धडकला. यावेळी मी पिकअपच्या कॅबीनमध्ये अडकलो होतो. त्यावेळी लोकांनी मला या कॅबीनमधून काढले. त्यावेळी माझ्या हाताला, पाठीला व डोक्यास मुक्कामार लागला. तसेच टेम्पो चालकासही केबीनमधून बाहेर काढावे लागले. या टेम्पोचा चालक दयाराम गुलाजी गोरदीया (रा.बरखेडा, ता.टोखुर्द, जि.देवास मध्यप्रदेश) हा ही जखमी झाला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# मैत्रीणीला विषारी औषध पाजून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न

करमाळा(सं.प्र.) : माझ्या बरोबर चल अन्यथा तुला नांदू देणार नाही व जिवंतही ठेवणार नाही.. असे म्हणून मित्राने मैत्रिणीला विषारी औषध पाजून ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. हा प्रकार ५ ऑगस्टला दुपारी १२ वाजता रावगाव (ता.करमाळा) येथे घडला आहे. या प्रकरणी विवाहित २२ वर्षाच्या महिलेने फिर्याद दिली आहे. त्यात तिने म्हटले आहे, की माझे मुळ गाव वीट असून सध्या मी माझ्या पती सोबत रावगाव येथे राहत आहे. पूर्वी वंजारवाडी येथे काम करत असताना देवळाली येथील विशाल लोंढे याच्याबरोबर ओळख झाली व त्यातून त्याची व माझी मैत्री झाली. या मैत्रीतून त्याने मला करमाळ्याहून मोटारसायकलवर वुरवंडे , ता.मुळशी, जि.पुणे येथे घेऊन गेला होता. त्यानंतरही तो सतत माझ्याकडे ये-जा करीत होता. ५ ऑगस्टला दुपारी बारा वाजता तो माझ्या राहत्या घरी आला व तो माझ्याबरोबर चल म्हणत होता. मी त्यास नकार दिल्याने त्याने जबरदस्तीने मला विषारी औषध पाजून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# उजनी जलाशयातील मोटारींची चोरी
# शेतकऱ्यांनी पकडलेल्या संशयितास पोलीसांनी सोडले

करमाळा(सं.प्र.) : उजनी जलाशयावर टाकलेल्या मोटारींची चोरी झाली असून यात संबंधित शेतकऱ्यांनी संशयितास मोटारीसह रंगेहाथ पकडून पोलीसांच्या ताब्यात दिले. असे असलेतरी पोलीसांनी मोटार ताब्यात घेऊन संशयितास सोडून दिले आहे. त्यामुळे शेतकऱ्यातून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. उमरड येथील अतुल मारूती कोठावळे यांनी ७ ऑगस्टला करमाळा पोलीसात फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २५ एप्रिल २०21 ला शिवाजीराव सरडे यांच्या दुकानातून मोनोब्लॉक कंपनीची मोटार ४७ हजार ५०० रू. ची विकत घेतली होती. ती उजनी जलाशयात टाकली होती. ६ ऑगस्टला सकाळी मोटार चालू करण्यास गेलो असता ती मोटार चोरीला गेल्याचे समजले. या प्रकरणी पोलीसांनी अज्ञात चोरट्या ाविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान संबंधित फिर्यादी व त्याच्या नातेवाईकांनी मोटारीचा शोध घेत जेऊर येथील एका रिवायडींगच्या दुकानात गेले. तेथे चोरीची मोटार दिसली. त्यावेळी संशयितास रंगेहाथ पकडून पोलीसांच्या ताब्यात दिले. परंतु पोलीसांनी मोटार ताब्यात घेऊन संशयितास सोडून दिले.

# डोळे येणे - संसर्गजन्य आजारापासून घ्यावयाची काळजी

गेल्या काही दिवसांपासून वातावरणात सतत होणाऱ्या बदलाने राज्यात डोळे येणे ही साथ सुरू आहे. डोळे येणे हा एक संसर्गजन्य आजार आहे. विशेषत: पावसाळ्यात हा आजार पसरतो. हा आजार एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीला होत असल्याने त्याचे प्रमाण वाढत आहे.

**डोळे येण्याची लक्षणे...**

१) डोळ्याचा रंग गुलाबी/लाल होणे
२) डोळ्यातून वारंवार पाणी, स्त्राव येणे
३) डोळ्यांना खाज सुटणे
४) डोळ्यांची जळजळ होणे
५) होळे जड येणे
६) डोळ्यांना प्रकाश व हवा सहन न होणे
७) दृष्टी धुसर होणे
८) डोळ्यांना सुज येणे.

**प्रतिबंधात्मक उपाय...**

१) वेळोवेळी हात स्वच्छ धुवा
२) डोळ्यांना स्वच्छ पाण्याने धुवा
३) पुन्हा पुन्हा डोळ्यांना स्पर्श करू नका
४) कुटूंबाच्या संपर्कात राहणे टाळा
५) घराबाहेर जाताना गॉगल वापरा
६) कॉन्टॅक्ट लेंस वापरणे टाळा
७) गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळा
८) संक्रमित व्यक्तीचे टॉवेल, रूमाल कपडे, मोबाईल, बेड वापरणे टाळा.
९) आपला परिसर स्वच्छ ठेवा
१०) संसर्ग झाल्याचे लक्षात येताच नेत्रतज्ञाचा सल्ला घ्यावा व त्यानुसार औषधोपचार करावे.

या संसर्गजन्य आजारात व्यवस्थित काळजी घेतल्यास डोळ्यांना आजार होत नाही आणि झाल्यास लक्षणापासून ३-६ दिवसात आराम मिळतो.

**.....डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे**
(नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
मो.9834071218, 9921013493

# करमाळ्यातील एटीएम फोडणाऱ्या संशयित चोरट्यांना विटा येथे अटक

करमाळा(सं.प्र.) : येथील आयडीबीआय बँकेचे एटीएम फोडून १३ लाख ६४ हजार रूपयांची रोकड चोरणाऱ्या फरार संशयित आरोपींना विटा (जि.सांगली) पोलीसांनी पकडले. एटीएम फोडण्यासाठी वापरलेल्या साहित्यासह तीन जणांना ताब्यात घेऊन करमाळा पोलीसांकडे सुपूर्द करण्यात आले आहे. सैफुल दुल्ली खान (वय-३७), निसियुम नियाज अहमद (वय-२४), हसन रहमत (वय-५३, सर्व रा.हरियाणा) अशी पकडलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून वेल्डींग करण्यासाठी वापरण्यात येणारे दोन सिलींडर, एका पांढऱ्या बॉक्समध्ये गॅस कटर, एक रबर पाइप, एक रेग्युलेटर, दोन चाकू, गाडीची कागदपत्रे फाइल, तीन मोबाईल व आयशर टेम्पो मिळून आला आहे. विटा पोलीस ठाण्याच्या पथकाला एचपी पेट्रोल पंपासमोरील रस्त्यावर तासगावकडून एक आयशर (क्र.एचआर ७४ ए ५०३०) येताना दिसला. संशय आल्याने त्यांनी थांबण्याचा इशारा केला मात्र तो थांबला नाही. पाठलाग करून पोलीसांनी तो थांबवला. त्यात तिघे संशयित व सदरचे साहित्य मिळून आले. हे साहित्य एटीएम फोडण्यासाठी वापरत असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ.राऊत Advanced dental Clinic & Root Canal Center
दातांचा दवाखाना

उपलब्ध सुविधा...
- इंटराओरल कॅमेराद्वारे तपासणी
- डिजीटल एक्स-रे
- अत्याधुनिक यंत्रणेद्वारे रूट कॅनल ट्रिटमेंट
- वेदनारहित दात व दाढ काढणे
- पडलेले दात बसविणे
- दात साफ करणे
- दाताच्या रंगाचे सिमेंट भरणे/चांदी भरणे





डॉ.कौस्तुभ काशिनाथ राऊत
बी.डी.एस.
(डेन्टल सर्जन)

उपलब्ध सुविधा...
- स्क्रुच्या सहाय्याने दात बसविणे (डेंटल इम्प्लांट)
- अक्कलदाढ काढणे
- वेडेवाकडे पुढे आलेले दात सरळ करणे
- अंशत: किंवा पूर्ण कवळी बसवणे
- हिरड्यांच्या रोगासाठी ट्रिटमेंट
- कॉस्मेटिक ट्रिटमेंट
- कर्करोगाचे निदान
- गरजेनुसार तज्ञ डॉक्टरांच्या भेटी

महात्मा गांधी शाळेच्या पाठीमागे, पुणे रोड, करमाळा. (मो.9552134186)

बार्शी येथील सुप्रसिध्द न्युरोसर्जन
डॉ.किशोर उध्दवराव गोडगे
MBBS.MS.MCh (Neurosurgeon)
आपल्या करमाळा शहरात
शेलार हॉस्पिटल येथे उपलब्ध !

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या रविवारी
दि.१३/८/२०२३ रोजी
सकाळी ११ ते दुपारी १

उपलब्ध सुविधा...
- कंबर दुखी, डोके दुखी, पाय दुखी
- हातापायाला मुंग्या येणे
- लहान मुलांचे मेंदूचे उपचार
- जन्मजात व्यंग व उपचार
- बिनटाक्याची मणक्याची शस्त्रक्रिया
- अर्धांगवायु उपचार
- मेंदूमध्ये रक्तस्त्राव उपचार
- दुर्बिणीद्वारे मेंदू व मणक्याची शस्त्रक्रिया

महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचार

- कर्मवीर जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी
- साई सुपरस्पेशालिटी सेंटर, बार्शी
बाळेश्वर नाका, यादव हॉस्पिटल शेजारी, बार्शी

संपर्क मो. 7620161520
फोन. (02182) 220111


प्रत्येक परिवारासाठी
परिवारातील प्रत्येकासाठी
येथे आहे काही खास....
या मान्सून सेलमध्ये तुमच्या
संपूर्ण परिवारासाठी आकर्षक ऑफरमध्ये
वस्त्रं खरेदीची सुवर्णसंधी!
MONSOON
सेल
10% ते 50% पर्यंत सूट
SALE
आकर्षक साड्या • मेन्स वेअर • लेडिज वेअर • किडस् वेअर • गृहसजावट
एल.डी.
बलदोटा
मेन रोड, जेऊर, ता. करमाळा, जि. सोलापूर मो. : 9096586755
* अटी लागू


भावपूर्ण आदरांजली
स्व.सुभाष(आण्णा) सावंत
भुकेल्यांसाठी अन्नाचा घास, तहानल्यांसाठी ओला श्वास
अंधारल्यांसाठी ज्ञानाचा प्रकाश, होतात 'आण्णा' तुम्ही आमचे खास !
आमचे प्रेरणास्थान, गोरगरीबांचे कैवारी व कामगार नेते स्व.सुभाष(आण्णा) सावंत यांच्या ९ व्या स्मृतीदिनानिमित्त
॥ भावपूर्ण आदरांजली ॥
अभिवादक
श्री छत्रपती शिवाजी तरूण मंडळ, सावंतगल्ली, करमाळा.